नोंदणी क्र.एफ-९३४/१९६२(मुंबई)
**महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई**
**पत्रव्यवहाराचा पत्ता : १ला मजला, मार्केटयार्ड, महात्मा फुले चौक, अहमदनगर ४१४००१**
Website : www.msceia.in Email : msceia.1962@rediffmail.com

## -: निवडणुक नियमावली :-

## सन २०२४ ते २०२९

१. वाणिज्य प्रमाणपत्र शिक्षण म्हणजे लघुलेखन, टंकलेखन, संगणक टंकलेखन, बुक किपींग अकाऊंटन्सी पत्रव्यवहार टंकलेखन/ तात्रिंक दुरुस्ती व कॉम्प्युटर पार्टसचे ज्ञान आवश्यक असणे.
२. शासनमान्य टंकलेखन संस्थांची संघटना म्हणजे असोसिएशन संघटना होय.
३. आर्थिक वर्ष म्हणजेच १ एप्रिल ते ३१ मार्च प्रत्येक वर्षाचे (सुरुवातीचे दोन्ही दिवस धरुन) मानावे.
४. सभासद म्हणजे वाणिज्य संस्थेला प्रशिक्षण देणारा तसेच टंकलेखनचा तांत्रिक शिक्षण देणारा व संघटनेचे नियम व नियमावली पाळणारा सभासद समजला जाईल.
५. संघटना निधी म्हणजे संघटनेच्या सभासदाकडुन प्राप्त झालेला निधी जनरल सेक्रेटरी, खजिनदार, परीक्षा सचिव, सह.सचिव यांनी संघटनेच्या नावावर जमा केलेला निधी होय.

सदर निधी मध्ये स्थिर व अस्थिर प्रॉपर्टीच्या कोणी बक्षीस किंवा देणगी म्हणुन दिलेली असेल तर ती संघटनेच्या नावावर असेल.

### आजीव सभासद :-

संघटनेचे आजीव सभासदत्व ठराविक वर्गातील व्यक्तीनांच मिळु शकते.

१. शासनमान्य संगणक टंकलेखन, लघुलेखन, संगणक टंकलेखन संस्थांचा हेतु शिक्षण देण्याचा असल्यामुळे नियम व नियमावली यांचे पालन करणारे कोणतीही संस्था संघटनेची सभासद होवू शकते.
२. आशा प्रकारची आजीवन सभासदत्व प्राप्त झालेली संस्थेला माहिती आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात संघटनेला कळविणे बंधनकारक आहे.
३. ज्या संस्थेला संघटनेच्या ध्येय व उद्दिष्टये यांच्या नियमाप्रमाणे संगणक टंकलेखन / लघुलेखन शिकविण्याचे ध्येय असेल अशीच संस्था आजीवन सभासदत्व प्राप्त करु शकते. इतर कोणतीही व्यक्ती संघटनेची सभासद होण्याचा अधिकार प्राप्त होणार नाही.
४. संघटनेचे सभासदत्व असल्याबद्दलचे प्रमाणपत्र सभासद झालेल्या सभासदास मिळण्यास योग्य राहिल.

### आजीव सभासद वर्गणी

अ) संघटनेच्या मंजुर उपविधी नं.डी.वाय.सी.सी./३२४/२०१८ नियमावली २ (१) मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे संघटनेची प्रवेश फी रु.२५/- आणि आजीवन सभासदत्व फी रु. ५००/- व रु.५००/- इमारत निधी ची रक्कम भरुन संघटनेचे सभासद होता येते.

ब) सभासद होवू इच्छिणा-या संस्थेने आपल्या आजीवन सभासदत्वाचा अर्ज संघटनेकडे रु.१०२५/- चा डिमांड ड्राफ्ट / रोख भरुन पाठवावा. कार्यकारी मंडळास सदर सभासदत्वाचा अर्ज मंजुर किंवा नामंजुर करणे विषयीचा अधिकार अध्यक्ष व महा सचिव यांचेकडे राहिल.

**टिप :-** संघटनेच्या आमसभा व कार्यकारणी सभेच्या ठरावानुसार वाढीव वर्गणी व इमारत निधीची रक्कम भरण्यास २९/३/२०२४ पर्यंत मुदतवाढ देवुन अंतिम पात्र मतदार यादी प्रसिध्द केलेली आहे. वर्गणी / इमारत निधी भरणा न करणा-या संस्थांना मतदान करता येणार नाही.

**सभासदत्व रद्द करणेबाबत**

वार्षिक मिटींगमध्ये जर एखादया संस्थेच्या सभासदाने किंवा त्याचे प्रमुखाने किंवा त्याचे वारसदाराने संघटनेच्या विरोधात कोणत्याही पध्दतीने वाईट कृत्य, संघटनेच्या हितावह नसल्याने किंवा गैरवर्तणूक केल्यास वार्षिक सभेतील उपस्थित असलेल्या २/३ सभासदाच्या सहमताने सभासदत्व रद्द करता येते.

सदर सभासदाने त्याने केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल समाधानकारक स्पष्टीकरण दिल्याशिवाय कार्यकारिणी मिटींग सभा बोलावता येणार नाही.

सदर निर्णयावर कुठलेही याचिका सादर करता येणार नाही. अशा प्रकारे संस्था की जी संघटनेची सभासद फी एकदम संघटनेच्या बाहेर काढल्यानंतर पुन्हा नविन सभासद होण्यास लायक राहणार नाही.

**कार्यकारी मंडळ (मंजुर उपविधी) :** चेंज रिपोर्ट नं. डी.वाय.सी./५०९३/२०१५ दि.३०/६/२०१८ व misc Application No. DYCC/३२५/२०१८ दि.३०/६/२०१८ अन्वये

संघटनेच्या कार्यकारी मंडळात खालीलप्रमाणे पदाधिकारी असतील.

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **अध्यक्ष** | **-** | **१** |
| **२.** | **वरिष्ठ उपाध्यक्ष** | **-** | **१** |
| **३.** | **उपाध्यक्ष** | **-** | **९** |
| **४.** | **जनरल सेक्रेटरी** | **-** | **१** |
| **५.** | **सह सेक्रेटरी** | **-** | **१** |
| **६.** | **खजिनदार** | **-** | **१** |
| **७.** | **सह खजिनदार** | **-** | **१** |
| **८.** | **परीक्षा सचिव** | **-** | **१** |
| **९.** | **परीक्षा सह सचिव** | **-** | **६** |

| | | | |
|---|---|---|---|
| **१०.** | **प्रवक्ता** | **-** | **१** |
| **१२.** | **प्रसिध्दी प्रमुख** | **-** | **१** |
| **१३.** | **वरिष्ठ सल्लागार** | **-** | **२** |

२६ + ०९ प्रतिनिधी एकुण ३५
प्रत्येक जिल्हयाला १ प्रतिनिधी मिळालाच पाहिजे या समजुतीने कार्यकारी मंडळ अस्तित्वात येते.

**(स्वीकृत सदस्य म्हणुन घेण्याची गरज भासल्यास कोणत्याही जिल्हयातून स्विकृत सभासद घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहिल.)**

**निवडणुक नियमावली**

२६ पदाधिकारी + ९ सदस्य असे एकुण ३५ + (४ स्वीकृत / २ महीला, २ पुरुष)

१. सभासदाने त्यांच्या जिल्हयाच्याच मतदार संघाच्या उमेदवारास एकच मतदान करावे.
२. सुचक हा त्याच जिल्हयाचा सभासद असला पाहिजे.
३. आजीव सभासद संस्थेच्या प्रतिनिधीस एक मतदान देण्याचा अधिकार असेल.
४. संस्थेचे पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम पुढील प्रमाणे

एकुण ३५ उमेदवार निवडुण दयावयाचे असून ३५ जिल्हयाचे प्रत्येक १ या प्रमाणे ३५ सदस्य असतील .

ज्या उमेदवारास निवडणुकीत भाग घ्यावयाचा आहे तो संघटनेचा आजीव सभासद असावा, तसेच ज्या जिल्हा मतदार यादीत त्याचे नाव समाविष्ट आहे त्याच जिल्हा मतदार संघाच्या उमेदवारीसाठी तो पात्र असेल. इतर जिल्हयासाठी प्रतिनिधी म्हणुन त्यास अर्ज करता येणार नाही.

प्रत्येक सभासदास हा तो ज्या जिल्हयाचा सभासद असेल त्याच जिल्हयाच्या प्रतिनिधीसाठी उमेदवारी अर्ज भरणा-या उमेदवारास एकच मत देईल. (इतर संघांचे उमेदवारासाठी त्यास मतदानाचा अधिकार असणार नाही.)

प्रत्येक उमेदवारी अर्ज हा एक सूचक व एक अनुमोदक यांचे सहीने पूर्ण भरलेला असावा. पूर्ण न भरलेला उमेदवारी अर्ज हा बाद ठरविला जाईल.

प्रत्येक सुचक हा ज्या जिल्हयाचा उमेदवार प्रतिनिधीसाठी असेल तो उमेदवाराचे जिल्हयातील सभासद असावा.

महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई चे आमसभा दि.६/७/२०२३ ठराव क्र. ६ उपविधी दुरुस्ती अ.क्र. जी व एच अन्वये उमेदवारी अर्जासोबत रु. ५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र ) निवडणुक डिपॉझीट विना परतीचे डिमांड ड्राफ्ट अथवा ऑनलाईन NEFT, RTGS व्दारे भरणा करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहिल.

**निवडणुक अधिकारी नियुक्ती :**

विद्यमान राज्य कार्यकारिणीकडुन ठरावाद्वारे संघटनेच्या आजीव सभासदांमधून एक निवडणूक निर्णय अधिका-यांची नेमणुक केली जाईल. निवडणुक निर्णय अधिकारी प्रारुप यादी जाहीर करतील. ती पात्र यादी जाहिर झालेनंतर हरकतीसाठी मुदत देईल. हरकतीचे निराकरण झालेनंतर अंतिम यादी प्रसिध्द होईल. त्यानंतर निवडणुक कार्यक्रम जाहिर करतील. त्याप्रमाणे कार्यकारी समितीच्या सभा दि.१३/१/२०२४ व २९/३/२०२४ मधील ठराव व निर्णयानुसार कार्यक्रम खालील प्रमाणे जाहिर केलेला आहे.

पंचवार्षिक निवडणुक कार्यक्रम पार पाडणेकामी सहा.निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन ॲड.शेखर देवराव दरंदलेपाटील, अहमदनगर हे कार्यालयीन कामकाज पाहतील याकामी त्यांची नेमणुक करण्यात येत आहे. या उपरोक्त प्रत्येक जिल्हा स्तरावर निवडणुक घ्यावयाची झाल्यास प्रत्येक जिल्ह्यासाठी सहा.निवडणुक अधिकारी यांची नियुक्त करुन निवडणुक गुप्त पध्दतीने घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| **सभासद यादी वेबसाईट व कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे** | **१५/०२/२०२४** |
| **हरकती मागविणे** | **१५/०३/२०२४ पर्यंत** |
| **आलेल्या हरकतींवर सुनावणी** | **२२/३/२०२४** |
| **अंतिम पात्र मतदार यादी प्रसिध्द** | **३१/०३/२०२४** |
| **निवडणुक कार्यक्रम प्रसिध्द** | **०१/०४/२०२४** |

**टिप -**

मंजुर उपविधी misc Application No. DYCC/३२५/२०१८ दि.३०/६/२०१८ व कार्यकारी समितीच्या निर्णयापासुन १३/०१/२०२४ पर्यंत सभासदत्व दिलेल्या संस्थांचाच अंतिम मतदार यादीत समावेश केलेला आहे. पात्र अंतिम यादीतील मतदार हे मतदानास व निवडणुक लढविण्यास पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : अहमदनगर**

**दिनांक : ३१/०३/२०२४**

**ॲड.विठ्ठलराव एस.बडे**
**निवडणूक अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य**
**संस्थांची संघटना, मुंबई**